महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्रमांक : तंशिविकापु/विवि/शासकीय व अनुदानित संस्था अभ्या.आढावा/२०२४/4489 दिनांक : ०७.११.२०२४.

**कालमर्यादा : १८.११.२०२४ (दुपारी ३.०० वाजेपर्यत)**

07 NOV 2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

विषय : शासकीय/अशासकीय अनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांचा आढावा घेऊन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरु असलेले अभ्यासक्रम बंद करणे, अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता कमी करणे, मागणीनुसार नवीन अभ्यासक्रम सुरु करणे इ. साठी प्रस्ताव सादर करण्याबाबत..

संदर्भ : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १०/एआयसीटीई/शा.व अशा.अनु.संस्था/अभ्यासक्रम आढावा/२०२५-२६/५३१ दि ६.११.२०२४.
२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीची मान्यता प्रक्रियेची जाहिर सुचना क्र. Advt.No.:RBAICTE/M-13/२४१५/२०२४/२०२५-२६, दि. ०४.११.२०२४.
२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले Approval Process Handbook 2024-25 to 2026-27

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने, नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीची मान्यता प्रक्रियेची जाहिर सुचना आणि Approval Process Handbook 2024-25 to 2026-27 अनुषंगाने कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीताची मान्यता प्रक्रिया सुरु होत आहे. त्याअनुषंगाने शासकीय / अशासकीय अनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश समाधानकारक झालेले नाहीत, असे अभ्यासक्रम बंद करणे, प्रवेशक्षमतेत घट करणे, अभ्यासक्रमांच्या नावात बदल करणे तसेच मागणीनुसार नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे यासाठी अभ्यासक्रमांचा आढावा घेवून शासनास संचालनालयामार्फत प्रस्ताव सादर करण्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. आपल्या संस्थेतील मागील ०५ शैक्षणिक वर्षातील सर्व अभ्यासक्रमांची मंजूर प्रवेशक्षमता, प्रवेशित जागा व रिक्त असलेल्या जागांचा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅन्डबुक मधील तरतुदींनुसार/मानकांनुसार आढावा घ्यावा.
२. शासनाची विहित वेळेत परवानगी घेण्याच्या अनुषंगाने, याबाबत विद्यार्थ्यांची मागणी, स्पर्धा व आसपास उपलब्ध असलेल्या इतर संस्थांचा अभ्यास करुन संस्थेतील अभ्यासक्रम बंद करणे, अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत घट करणे, अभ्यसक्रमांच्या नावात बदल करणे इ. याबाबत आपल्या शिफारशींसह प्रस्ताव व सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये मागील ०५ वर्षातील प्रवेशाबाबतची माहिती भरुन संस्थेच्या प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह स्कॅन कॉपी (पीडीएफ) व सॉफ्ट कॉपी या विभागीय कार्यालयास **दिनांक १८.११.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत** (ropune@dtemaharashtra.gov.in) या ई-मेल आयडीवर पाठवावी.

३. आपल्या संस्थेच्या परीसरातील उद्योगधंद्याच्या मागणी, उपलब्ध रोजगाराच्या संधी व स्थानिक लोकप्रतिनिधी / विद्यार्थी / पालक यांची मागणी तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅन्डबुक मधील तरतुदींनुसार नवीन अभ्यसक्रम सुरु करणे अथवा अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे प्रस्तावित करावी. तसेच त्या अभ्यासक्रमाची गरज, आवश्यकता, मागणी तपासून तसेच तो अभ्यासक्रम सुरु झाल्यानंतर त्या अभ्यासक्रमात जागा रिक्त राहणार नाहीत, याबाबतची चाचपणी करुन त्याबाबतचे प्रस्ताव आपल्या शिफारशीसह या विभागीय कार्यालयास उपरोक्त प्रस्तावासोबत सादर करावे.

४. नवीन अभ्यासक्रम प्रस्तावित करतांना अथवा सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता वाढ प्रस्तावित करताना अभ्यासक्रमास आवश्यक शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी, पायाभुत साधन सुविधा, यंत्रसामुग्री व उपकरणे यांची गरज कशी भागविली जाणार, याबाबतचे देखील आपले अभिप्राय द्यावेत.

५. अभ्यासक्रम बंद करणे, अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता कमी करणे प्रस्तावित करतांना सदर अभ्यासक्रमांना शिकविणारे शिक्षकीय कर्मचारी अतिरिक्त ठरत आहेत किंवा कसे, याबाबत माहिती द्यावी.

शासनाची विहित वेळेत परवानगी घेण्याच्या अनुषंगाने आपल्या संस्थेचे प्रस्ताव या विभागीय कार्यालयाच्या शिफारशीसह संचालनालयास सादर करण्यासाठी **दिनांक १८.११.२०२४ पर्यंत** या विभागीय कार्यालयास **(सॉफ्ट व पीडीएफ फाईल)** ई-मेलद्वारे सादर करावेत. विहित कालावधीनंतर प्राप्त होणा-या प्रस्तावांवर या विभागीय कार्यालयामार्फत कोणतीही कार्यवाही होणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे प्रपत्र.

(मारुती जाधव)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

# प्रपत्र

संस्थेचे नांव व डिटीई कोडः ..............................................................

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशित वर्ष | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | रिक्त जागा | प्रवेशाची टक्केवारी (%) |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | | २०२०-२१ | | | | |
| | | २०२१-२२ | | | | |
| | | २०२२-२३ | | | | |
| | | २०२३-२४ | | | | |
| | | २०२४-२५ | | | | |
| २ | | २०२०-२१ | | | | |
| | | २०२१-२२ | | | | |
| | | २०२२-२३ | | | | |
| | | २०२३-२४ | | | | |
| | | २०२४-२५ | | | | |

मंजूर प्रवेश क्षमता व मंजूर प्रवेश क्षमते अंतर्गत प्रवेशित विद्यार्थी संख्या (अधिसंख्य जागा किंवा प्रवेश वगळून).